दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १४४ वा रविवार दि.१७ नोव्हेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# मुरुडला तालुक्याचा दर्जा मिळवून देणार

## मुरुड शहरात अभूतपूर्व रॅलीने आ. रमेशआप्पा कराड यांचे जोरदार स्वागत





लातूर : – लातूर तालुक्यात सर्वात मोठ्या असलेल्या मुरुड शहरातील ३६ कोटी रुपये खर्चाची पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवला असून २५ कोटी रुपये खर्चाचे उपजिल्हा रुग्णालय यासह विविध विकास कामासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी मिळवून दिला. येत्या काळात महायुती शासनाच्या माध्यमातून मुरुड शहराला तालुक्याचा दर्जा मिळून देणार असल्याची ग्वाही भाजपा महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांनी दिली. प्रचार सभेच्या निमित्ताने अभूतपूर्व रॅलीने आ. कराड यांचे मुरुडकरांनी जोरदार स्वागत केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भाजपा महायुतीच्या प्रचारार्थ विराट जाहीर सभा झाली या सभेस महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड, शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख अँड बळवंत जाधव, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आमदार विक्रमबाप्पा काळे, भाजपाचे नेते शंकराप्पा भिसे, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, फकीरा ब्रिगेडचे प्रा. संजय शिंदे, भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा कराड तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, मुरुडच्या सरपंच अमृताताई नाडे, उपसरपंच हनुमंतबापूं नागटिळक, सांगायो समिती अध्यक्ष वैभव सापसोड, महेश कणसे राजकुमार सुरवसे, समाधान शितोळे, बाबा कुंभार, लता भोसले, अनंत कणसे, विष्णू महानवर, रवी माकोडे, श्रुती सवई, वैजनाथ हराळे, नागराज बचाटे, अंकुश कुंभार यांच्यासह अनेक मान्यवरांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. या सभेला हजारोचा जनसामुदाय उपस्थित होता. यात महिलांचा सहभाग मोठा दिसून आला. सभेपूर्वी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत उघड्या जीपमधून आ रमेशआप्पा कराड यांच्यासह मान्यवर नेत्यांची मोठ्या उत्साहाच्या आणि जल्लोषाच्या वातावरणात अभूतपूर्व भव्य प्रचार रॅली काढण्यात आली या रॅलीत महिला पुरुष तरुण प्रचंड संख्येने सहभागी झाले होते रमेशआप्पा कराड साहेब तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है, महायुतीचा विजय असो, भाजपाचा विजय असो या सह विविध घोषणांनी मुरुड शहर दणाणून सोडले होते. ही रॅली प्रचाराची आहे की विजय मिरवणूक आहे. रमेशआप्पा निवडून येणार लातूर ग्रामीण मध्ये कोणत्याही परिस्थितीत यावेळी परिवर्तन घडणार असेच जनतेतून बोलले जात होते.

लातूर ग्रामीण मतदार संघात शंभर टक्के परिवर्तन होऊन महायुतीचा विजय होणार हे सूर्यप्रकाशाइतके सत्य असून गेल्या निवडणुकीतच रमेश कराडांच्या समोर विजय होऊ शकत नाही हे कळून चुकल्यानेच देशमुखांनी भ्रष्ट पैशातून मतदार संघ विकत घेण्याचे पाप केले असल्याचे सांगून मुरुड येथील जाहीर सभेत बोलताना महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, गेल्या पाच वर्षात काँग्रेस आमदारांनी कोणती विकासाची कामे केली कुठल्या योजना आणल्या याचे उत्तर जनता मागत आहे. निष्क्रिय आमदाराची आता त्यांचे काका गॅरंटी घेऊन आशीर्वाद मागत आहेत कामे केली असती तर गॅरंटी घेण्याची वेळ आली नसती. पराभव समोर दिसत असल्याने मतदारांना वेगवेगळी अमिषे दाखवली जात आहेत काँग्रेसच्या भूलथापांना बळी पडू नका पैसे देत असतील तर ते जरूर घ्या वाजवून घ्या आपल्या कष्टाचा, घामाचा चोरी केलेला भ्रष्ट पैसा परत मिळतोय हे विसरू नका. सर्वांगीण विकासाला साथ द्या कमळाच्या चिन्हा समोरील बटन दाबून मला आशीर्वाद द्यावेत आणि देशमुखांना त्यांची जागा दाखवून द्यावी असे आवाहन केले.

विज बिल माफ करून आणि भविष्य मोफत वीज देण्याचा निर्णय घेऊन शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्याचे काम महायुती शासनाने केले विविध योजनेच्या माध्यमातून महिलांचा सन्मान वाढविला असल्याचे सांगून आ. विक्रम काळे म्हणाले की, मराठा समाजाच्या आरक्षणाचा निर्णय महायुती शासनाने घेतला असून या निर्णयामुळे मराठा समाजातील बहुसंख्य तरुणांना शिक्षणात आणि नोकरीत त्याचा लाभ मिळत आहे मुलींना सर्व प्रकारचे मोफत शिक्षण केले .

# आ. संभाजी पाटील निलंगेकर यांना विविध संघटनांचा पाठींबा



निलंगा / प्रतिनिधी :– जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा निलंगा मतदारसंघाचे भाजपा महायुतीचे उमेदवार आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी मतदारसंघासह जिल्ह्यात केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून विकासाची गंगा वाहती केली आहे. आगामी काळातही विकासाचा पॅटर्न घडावा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील विकसित भारत घडावा यासाठी राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार येणे गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेवून आ. निलंगेकर यांना या विधानसभा निवडणुकीत विविध संघटनांच्या वतीने जाहीर पाठींबा देण्यात येत आहे. या संघटनांच्या पाठींब्यामुळे आ. संभाजी पाटील निलंगेकर यांची विक्रमी मताधिक्याने विजयी होण्याची वाटचाल सुकर होत आहे. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकार आणि राज्यातील भाजपा महायुतीचे सरकार लोकहिताच्या अनेक योजना लोकांपर्यंत पोहोचविण्यात यशस्वी झाले आहेत. त्याचबरोबर विकासाच्या योजनाही मोठ्या प्रमाणात प्रत्यक्षात साकारल्या जात असून अनेकविकासकामे प्रगतीपथावर आहेत. त्या अनुषंगानेच निलंगा मतदारसंघातील केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची विकास कामे झालेली आहेत. त्याच बरोबर ही विकासगंगा सातत्याने वाहतच आहे. विशेष म्हणजे लोकहिताच्या अनेक योजनांचा लाभ मतदारसंघातील प्रत्येक समाजघटकांना होत आहे. आगामी काळातही ही विकासाची गंगा वाहती राहून लोकहिताच्या आणखी योजना आमलात आणण्यासाठी राज्यात भाजपा महायुतीचे सरकार पुन्हा येणे आवश्यक आहे. या महायुती सरकारमध्ये निलंग्याचे लोकप्रतिनिधी म्हणून संभाजी पाटील निलंगेकर यांची वर्णी लागणे तितकेच गरजेचे असल्याने त्यांच्या विजयासाठी विविध संघटना त्यांना जाहीर पाठींबा देत आहेत. आ. संभाजी पाटील निलंगेकर यांच्या विजयासाठी जाहीर पाठींबा देणाऱ्यांमध्ये राष्ट्रीय बहुजन पार्टी,सगर (गवंडी समाज), ओबीसी हक्क परिषद, माळी महासंघ, स्वराज्य सेना, भारतीय फायटर सेना, खाकी फाऊंडेशन यांसह विविध संघटनांचा समावेश आहे. या संघटनांच्या राष्ट्रीय व प्रदेशाध्यक्षांनी आपल्या जाहीर पाठिंब्याचे पत्र आ. निलंगेकर व अरविंद पाटील निलंगेकर यांच्याकडे सुपूर्द केलेले आहे. त्याचबरोबर या संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आ. निलंगेकर यांच्या विजयासाठी पूर्णपणे आपली ताकद त्यांच्या पाठिशी उभी करण्याचा संकल्प केलेले आहे.

# २०१९ च्या निवडणुकीत आपल्यावरील ' मॅनेज ' हा आरोप तथ्यहिन आहे : सचिन देशमुख



लातूर : २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आपल्याला शिवसेनेने लातूर ग्रामीण मतदार संघातून अधिकृत उमेदवारी दिली होती. त्या निवडणुकीत दुर्दैवाने महायुतीच्या नेत्यांनी योग्य ते सहकार्य न केल्याने आपल्याला पराभवाचा सामना करावा लागला. असे असले तरी त्या निवडणुकीत आपण अन्य राजकीय पक्षांना ' मॅनेज ' झाल्याचा जो आरोप केला जातोय, तो आरोप तथ्यहिन असल्याचे प्रतिपादन सचिन रामराजे देशमुख यांनी शनिवारी लातुरात पत्रकारांशी बोलताना केले. आता २०२४ च्या विधानसभा निवडणुकीची धावपळ सुरु आहे. असे असले तरी अजूनही कांही मंडळी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आपण ' मॅनेज ' झाल्याची चर्चा कारण नसताना करत असल्याचे आढळून आले आहे. कोणतेही तथ्य नसताना वारंवार असा आरोप केला जात असल्याने आपला स्वाभिमान जोपासण्यासाठी आज प्रसार माध्यमांसमोर आलो आहोत. यापुढे आपल्यावर मॅनेजचा तथ्यहिन आरोप करणाऱ्या संबंधितांविरुद्ध आपण अब्रुनुकसानीचा दावा करणार असल्याचे सांगून सचिन देशमुख म्हणाले की, आपल्याला २०१९ ची उमेदवारी देताना लातूर ग्रामीणचे काँग्रेस पक्षाचा उमेदवारही ठरलेला नव्हता. आपण शिवसेनेकडून उमेदवारी स्वीकारण्यापूर्वी भारतीय जनता पार्टीचा उद्योग आघाडीचा राज्याचा प्रमुख म्हणून कार्यरत होतो. आपण त्यावेळी भाजपाकडेही लातूर ग्रामीण मतदार संघाची उमेदवारी मागितली होती. आपले गाव लातूर ग्रामीण मतदार संघातील सारोळा हे आहे. योगगुरू रामदेवबाबा यांनीही आपल्या नावाची शिफारस केली होती. रामदेव बाबांनीच उद्धव ठाकरे यांच्याशी बोलून मला उमेदवारी देण्यास प्रवृत्त केले होते. आपण भाजपशी संबंधित असल्याने भाजप व शिवसेनेचे कार्यकर्ते , पदाधिकारी महायुती धर्माचे पालन करून आपल्याला सहकार्य करतील, असे वाटत होते. पण कोणाचीही मदत न मिळाल्याने आपल्याला पराभवाचा सामना करावा लागला. त्यामुळे त्या निवडणुकीत आपला काहीही दोष नसताना मॅनेज उमेदवार म्हणून आपली नाहक बदनामी केली गेली. लातूर ग्रामीणच्या मतदारांनी त्या निवडणुकीत नोटाला मतदान केले नव्हते, तर नोटा ला ते मतदान करवून घेण्यात आले होते,असा आरोपही सचिन देशमुख यांनी यावेळी केला. आपण आजही भाजपचे प्रदेश कार्यकारिणीचे विशेष निमंत्रित सदस्य असून महायुतीसोबतच आहोत. पक्षाने लातूर शहर व लातूर ग्रामीण या दोन्ही मतदार संघातील महायुतीचे उमेदवार निवडणून आणण्याची दिलेली जबाबदारी पूर्ण करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. लातूर जिल्ह्यात महायुतीच्या धर्माचे पालन केले जात नाही हा अनुभव आहे. त्यामुळे आपण याठिकाणी राजकारण करण्यापेक्षा समाजकारण करण्यास प्राधान्य देणार आहोत. आपला कोणाबद्दलही आक्षेप नाही. या मतदार संघाशी आपली नाळ जुळलेली असल्याने २०१९ मी च्या निवडणुकीतही अवघ्या सहा दिवसात आपण ७९ गावात फिरलो होतो. सोबत लोक कमी असल्याने पराभूत झालो असलो तरी कोणाशीही मॅनेज झालेलो नव्हतो. मॅनेज हा डाग पुसण्यासाठीच आपण माध्यमांना सामोरे आल्याचे सचिन देशमुख यांनी स्पष्ट केले.

## विधानसभा निवडणूक मतदानासाठी उरले अवघे ७२ तास. लातूर पोलीस क्शन मोडवर..





लातूर :– महाराष्ट्र राज्यातील विधानसभा निवडणुका २०२४ निर्विघ्नपणे व खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडण्यासाठी लातूर पोलिसांनी सुरुवातीपासूनच नियोजनबद्ध उपाय योजना सुरू केल्या आहेत. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांचे मार्गदर्शनात काटेकोरपणे अंमलबजावणीही करण्यात येत आहे.

विधानसभा मतदान प्रक्रिया २० नोव्हेंबर रोजी पार पडणार असून सदर प्रक्रियेस अवघे ७२ तास शिल्लक असून लातूर पोलीस अधिक सतर्क झाले आहेत. लातूर पोलिसांकडून करण्यात येणाऱ्या कारवाया अधिक तीव्र करण्यात येणार आहेत. यामध्ये रोज रात्री सतर्क पेट्रोलिंग व ऑल आऊट, कोंबिंग ऑपरेशन राबविणे, प्रत्येक वाहनांची बारकाईने कसून तपासणी व चौकशी करणे, देशी विदेशी दारूची अवैध विक्री व्यवसाय, वाहतूक,साठेबाजी होणार नाही याची काळजी घेऊन याआधी गुन्हे दाखल झालेल्यावर विशेष लक्ष ठेवून कारवाई करणे,

रोख रकमेची संशयास्पद देवाण–घेवाण , ट्रांजेक्शन व इतर व्यवहाराची माहिती काढून कार्यवाही करणे, सराईत गुन्हेगारांना ताब्यात घेऊन त्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवणे त्यांच्या संशयास्पद हालचाली निदर्शनास येतात कडक कारवाई करणे, अवैध शस्त्रांचा शोध घेऊन अवैध शस्त्र बाळगणाऱ्या इसमावर कारवाई करणे, आंतरराज्य सीमेवर असणारे चेकिंग पॉईंट अधिकाधिक कार्यक्षम करून संशयास्पद वस्तूंची देवाण–घेवाण होणार नाही याची दक्षता घेणे, विधानसभा निवडणूक कर्तव्यासाठी उपलब्ध झालेल्या केंद्रीय पोलीस दलातील व होमगार्ड यांचा जास्तीत जास्त उपयोग करून प्रभावी कार्यवाही करणे, कर्नाटक राज्यातून लातूर जिल्ह्यात येणाऱ्या चोर वाटावर लक्ष ठेवून तेथे अचानकपणे नाकाबंदी करून सदर मार्गावरून मार्गक्रमण करणाऱ्या वाहनांना थांबवून बारकाईने सखोल चौकशी करण्यात येणार आहे.

तसेच सीमा वरती भागात असलेल्या संवेदनशील गावावर विशेष लक्ष ठेवून प्रभारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अचानक गाव भेटी परिस्थितीची माहिती करून घेणे व तात्काळ प्रभावी उपाययोजना करणे, लातूर जिल्हास जोडलेल्या सर्व आंतरराज्य तपासणी नाकावरती निमलष्करी दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आले आहेत, लातूर पोलीस सोशल मीडिया मॉनिटरिंग सेलच्या माध्यमातून विधानसभा निवडणुकीशी संबंधित प्रचार व आक्षेपार्ह घटना सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रक्षेपित करणारे लोकांवर नजर ठेवून कारवाई करण्यात येत आहे. राजकीय दृष्ट्या महत्त्वाच्या गावांमध्ये शक्ती प्रदर्शन करीत रोड मार्च करण्यात येणार असून संवेदनशील ठिकाणचे ड्रोन द्वारे निगराणी करून अप्रिय घटना घडणार नाहीत व सदरच्या निवडणुका,मतमोजणी निर्विघ्नपणे पार पडेल याची दक्षता घेण्यात येणार आहे.

## संपादकीय....

# ‘सरन्यायाधीश’

सध्या सर्वोच्च न्यायालयात एकूण ३३ न्यायमूर्ती आहेत. आपल्या देशातील संकेतानुसार यातील ज्येष्ठ न्यायमूर्तींना ‘सरन्यायाधीश’ या पदावर नेमतात. यासाठी ‘सेवाज्येष्ठता’ हा निकष फार महत्त्वाचा समजला जातो. आज आपल्या देशातील न्यायपालिकेसमोर आव्हानांचा डोंगर आहे. असेच आव्हान १९७०च्या दशकात उभे राहिले होते. तेव्हा पंतप्रधान इंदिरा गांधींनी ‘बांधिलकी मानणारी न्यायपालिका’ तसेच ‘बांधिलकी मानणारी नोकरशाही’ या संकल्पना चर्चेत आणल्या होत्या. तेव्हा भारतात जे समाजवादी तत्त्वज्ञान जोरात होते. त्याला साजेशा या संकल्पना होत्या. यामुळेच तेव्हाच्या केंद्र सरकारने न्या. अजितनाथ रे यांची नेमणूक केली होती.

त्यानंतर अनेक वर्षे आपल्या देशात हा वाद सुरू राहिला. आता अशा नेमणुका ‘न्यायमूर्ती निवडमंडळ’ (कॉलेजियम पद्धत) करते. न्या. संजीव खन्नांच्या नेमणुकीचे स्वागत करताना आपल्या देशात झालेले हे बदल समजून घेणे गरजेचे आहे. १९८०च्या दशकात सरकार न्यायमूर्तींच्या नेमणुकीत हस्तक्षेप करते अशी कुणकुण सुरू झाली होती. मात्र सर्वोच्च न्यायालयाने १९८२ साली दिलेल्या निर्णयानुसार न्यायमूर्तींच्या नेमणुकात सरकारचे महत्त्व मान्य केले. हा निर्णय सात न्यायमूर्तींच्या खंडपीठाने दिला होता. यानुसार सर्वोच्च व उच्च न्यायालयातील न्यायमूर्तींच्या नेमणुका करताना सरकारने सर्वोच्च न्यायालयाशी चर्चा करावी. पण चर्चा म्हणजे सरकारचे व सर्वोच्च न्यायालयाचे एकमत झाले पाहिजे, असे नव्हे.

यावर उपाय म्हणून सर्वोच्च न्यायालयाने १९९३ साली पहिला अतिशय महत्त्वाचा निर्णय दिला. हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाचे नऊ न्यायमूर्ती असलेल्या खंडपीठाने दिला होता. हा निर्णय ७ विरूद्ध २ असा होता. या निर्णयात या नेमणुका सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश करतील, असे म्हटले होते. तसे पाहिले तर हा निर्णय ऐतिहासिक होता. यामुळे घटनेच्या कलम १२४ चे महत्त्व नष्ट झाले.

कलम १२४ नुसार वरिष्ठ न्यायपालिकेतील न्यायमूर्तींच्या नेमणुका राष्ट्रपती करतील, असे स्पष्ट म्हटले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या १९९३ सालच्या निर्णयानुसार सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश इतर दोन ज्येष्ठ न्यायमूर्तींच्या मदतीने या नेमणुका करतील. ही कॉलेजियम पद्धतीची सुरुवात होती. ही पद्धत १९९८ साली पक्की झाली. या वर्षी सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ न्यायमूर्तींच्या खंडपीठाने कॉलेजियमची संख्या ‘एक अधिक दोन’ वरून ‘एक अधिक चार’ अशी केली.

यथावकाश कॉलेजियम पद्धतीतील दुर्गुण समोर यायला लागले. कॉलेजियम पद्धतीवरील महत्त्वाचा आक्षेप म्हणजे यात पारदर्शकता नाही. याद्वारे एक प्रकारचा भ्रष्टाचार होऊ शकतो. याद्वारे चांगल्या व्यक्ती निवडल्या जातातच असे नाही. जर न्यायपालिका जीवनाच्या इतर क्षेत्रात पारदर्शकता मागत असेल तर न्यायमूर्तींच्या नेमणुकीतही पारदर्शकता आणली पाहिजे. अशी पारदर्शकता कॉलेजियम पद्धतीत नाही. यामुळे अनेक अभ्यासक कॉलेजियम पद्धतीबद्दल साशंक होते व आहेत. यथावकाश या पद्धतीतील तोटे समाजासमोर आले. आता या पद्धतीला पर्याय शोधणे सुरू आहे.

हा पर्याय म्हणजे ‘राष्ट्रीय न्यायमूर्ती नेमणूक आयोग’ असावा, अशी मागणी होत होती. त्याप्रमाणे मोदी सरकारने २०१४ साली कायदा केला. त्यानुसार या नव्या आयोगात सहा सदस्य असणार होते. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश, सर्वोच्च न्यायालयातील दोन ज्येष्ठ न्यायमूर्ती, केंद्रीय कायदा मंत्री आणि समाजातील दोन आदरणीय व्यक्ती; असे सहा सदस्य. या कायद्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने २०१५ साली दिलेल्या निर्णयाने हा आयोग रद्द ठरला. तेव्हासुद्धा अनेक अभ्यासक म्हणत होते की, हे योग्य नाही.

कॉलेजियम पद्धत योग्य असती तर ‘ती बदला’ अशी मागणी आलीच नसती. ही पद्धत सुमारे ३१ वर्षांपासून आजही सुरू आहे. कॉलेजियम पद्धत असूनही अनेक भ्रष्ट व्यक्तींची न्यायमूर्तीपदी नेमणूक झाल्याचे दिसून आले. या संदर्भात चटकन आठवणारे नाव म्हणजे कलकत्ता उच्च न्यायालयाचे न्या. सौमित्र सेन. कॉलेजियमने सौमित्र सेन यांची कलकत्ता उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून नेमणूक केली. नंतर न्या. सेन यांच्यावर आर्थिक भ्रष्टाचाराचे आरोप झाले. २००९ साली त्यांच्याविरोधात महाभियोगाची कारवाई सुरू झाली. सरतेशेवटी २०११ साली न्या. सेन यांनी राजीनामा दिला. पण मुळात अशी भ्रष्ट व्यक्ती नेमलीच कशी, हा प्रश्न उरतोच.

कॉलेजियम पद्धतीचे टीकाकार असा आरोप करत असत की जगात कोठेही अशी पद्धत नाही ज्यात न्यायमूर्तीच न्यायमूर्तींच्या नेमणुका करतात. जगभर अशा नेमणुकांत समाजातील विविध घटकांचा सहभाग असतोच असतो. यातूनच मग न्यायमूर्ती नेमणूक आयोग असावा अशी कल्पना पुढे आली. हे सर्व समाज आणि राजकारणी वर्ग बघत होता. म्हणूनच मग ‘न्यायमूर्ती नेमणूक आयोग’ असावा अशी चर्चा सुरू झाली. नंतर तसे विधेयक लोकसभेत आले.

या विधेयकासंदर्भात एक बाब ध्यानात घेतली पाहिजे. न्यायमूर्ती नेमणूक आयोग कायद्याबद्दल सर्वपक्षीय एकमत होते शिवाय या विधेयकाला २० राज्यांच्या विधानसभांनी पाठिंबा दिला होता. संसदेने २०१४ साली कायदा केला तेव्हा लोकसभेत या कायद्याच्या बाजूने ३६७ खासदारांनी मतदान केले तर या कायद्याच्या विरोधात एकाही खासदाराने मतदान केले नव्हते.

असाच प्रकार राज्यसभेतही दिसून आला. त्यावरून कॉलेजियम पद्धतीबद्दल समाजात किती राग आहे हे सर्वोच्च न्यायालयाने लक्षात घेतले असते, तर बरे झाले असते. असे असूनही सर्वोच्च न्यायालयाने हा कायदा ‘घटनाबाह्य’ ठरवला. मात्र आजही हा मुद्दा पूर्णपणे चर्चेतून बाहेर गेलेला नाही. याबद्दल लवकरच आपल्याला सहमतीने निर्णय घ्यावा लागेल.

# कांदा रडवणार



राज्यात निवडणुकीच्या प्रचारांना जसे उधाण आले आहे तसेच कांदा–लसणाच्या तेजीलाही. निवडणूक तोंडावर असताना भाज्यांचे वाढणारे दर ग्राहकांपेक्षा, निवडणुकीच्या रिंगणात उभे असलेल्या उमेदवारांसाठी तापदायक ठरू शकतात. गेल्या आठवड्यात ४०० रुपये किलोने विकला जाणारा लसूण आता किरकोळ बाजारात ५०० रुपये किलो अशा दराने विकला जात आहे, तर कांदा ८० रुपये किलो झाला आहे. दिवाळीनंतर अचानक झालेल्या या महागाईमुळे नागरिकांमध्येही नाराजीचा सूर उमटू लागला आहे. सोबत इतर भाज्यांचेही भाव कडाडले आहेत. त्यामुळे सामान्य माणसाच्या जेवणाला महागाईची फोडणी बसली.

मुंबई, पुण्यातील बाजारांत तर कांद्याचे दर १०० रुपये किलो एवढे महागले आहेत. साधारण दोन आठवडे कांद्याचे दर असेच तेजीत राहतील, असा व्यापार्यांचा अंदाज आहे. परतीच्या पावसाचा फटका कांदा उत्पादनावर झालेला दिसत आहे. त्यामुळे बाजारात कांद्याची आवक हळूहळू कमी होऊ लागली आहे. नवीन वर्षात लसणाचे नवीन पीक बाजारात येईपर्यंत लसणाची भाववाढदेखील अशीच सुरूच राहण्याची शक्यता आहे.

दिवाळीतील सणासुदीच्या दिवसांत नाशिक परिसरातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये होणारी कांद्याची खरेदी–विक्री आठवडाभर काहीशी बंद होती. सोबत खराब हवामानामुळे पुरवठा साखळीलादेखील फटका बसला. या आठ दिवसांचा मोठा खंड पडल्यामुळे कांद्याची खरेदी–विक्री आणि पुरवठा यात उणीव निर्माण झाली. परिणामी नाशिकमधून राज्यासह देशभरात ठिकठिकाणी जाणारा कांदा पोहोचू शकला नाही.

मुंबई, नागपूर, पुण्यासह, दिल्लीतही ग्राहकांना कांद्याचा तुटवडा जाणवू लागला होता. शेतकर्यांकडील उन्हाळी कांदा जवळपास संपण्यातच आला असल्याचे चित्र आहे. तर अगदी किरकोळ प्रमाणात म्हणजे फक्त दोन ते तीन टक्के इतकाच काय तो कांदा आता शिल्लक आहे. शिवाय दिवसेंदिवस बाजारात त्याचीही विक्री सुरू आहे. जास्त काळ टिकणारा, दर्जेदार अशा उन्हाळी कांद्यांची बाजारातील उपलब्धता आता कमी झाली आहे.

गेल्या वर्षभरापासून आधी फेब्रुवारी–मार्च मग ऑगस्ट आणि नोव्हेंबर–डिसेंबरमध्ये लसूण ४०० रुपये किलो वर जाण्याची आता ही तिसरी वेळ आहे. त्यामुळे लसूण खरेदी करावा की नाही असा प्रश्न सर्वांना पडत आहे. लसणाशिवाय डाळीची, भाजीची फोडणी म्हणजे नाक मुरडत खाण्यासारखं! जितकी मागणी आहे त्याच्या फक्त ६० टक्के लसूण बाजारात उपलब्ध असल्याने दर वाढत आहे. सध्या मध्य प्रदेश, राजस्थान तर कधी गुजरातच्या लसणाची आवक होत आहे. घाऊक बाजारात देशी लसूण उपलब्ध असला तरी वाढत्या मागणीमुळे लसणाची कमतरता बाजारात जाणवत आहे.

उच्चभ्रू परिसरांत तर हे भाव त्यापेक्षाही जास्त महागल्याचे पाहायला मिळाले. माणूस कितीही श्रीमंत असला तरी भाज्यांचे वाढलेले दर त्यांचेही खिसे कापतो हे मात्र खरंय. त्यात कांदा–लसणासारख्या रोजच्या जेवणातील पदार्थ डावलून, अशा कितीशा रसोई बनतात देव जाणे. पंचपक्वानाचं सोडा, साधसं जेवणंदेखील फोडणीशिवाय खायचं म्हणजे जिभेची चव ओळखण्याची क्षमता घालवण्यासारखचं.

नेहमीप्रमाणे सर्वसामान्य माणूस या महागाईने होरपळणार. गरिबातील गरीब माणूसदेखील चटणी–भाकरी सोबत कांदा–लसणाची फोड खाऊन आपली गुजराण करतो. या हंगामात भुईमूग–भाताची काढणी करणारे शेतकरी केवळ भाकर, ठेचा आणि कांद्याच्या जीवावर रानामाळांत राबत असतात. महाराष्ट्रात खरीप हंगामात एकूण सुमारे २.३० लाख हेक्टरवर कांद्याची लागवड केली जाते. हे कांद्याचे उत्पादन प्रामुख्याने नाशिक, पुणे, लातूर, छत्रपती संभाजीनगर या विभागांत होते. राज्यातील इतर भागांत कांद्याचे भरघोस उत्पादन घेण्याइतकी अनुकूल परिस्थिती नाही.

यावर्षी कांदा लागवडीने सरासरी गाठली होती; परंतु काढणीच्या काळात नाशिक, पुण्यासह मराठवाड्यात चांगलाच जोरदार पाऊस झाला. त्यामुळे कांद्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. कांदा लागवडीतून चांगली रक्कम मिळत असल्याने शेतकरी लसूण लागवडीकडे कमी वळत गेले. लागवडीसाठी यावेळी लसणाच्या बेण्याचे दर जास्त होते. शेतकर्यांकडे पैशांची चणचण असते. त्यामुळेही लसूण लागवडीकडे शेतकर्यांनी पाठ फिरवल्याचे दिसून आले. परंतु आजघडीला शेतकर्याला कांद्याने रडवले आणि लसणाने टाकले अशी परिस्थिती उद्भवली आहे.

खराब हवामानामुळे अनेक राज्यांत कांदा आणि लसूण या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. सरतेशेवटी, राज्यातील बाजारपेठांत कांदा आणि लसूण यांची आवक कमी झाल्याने तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे पुढील निदान एक महिनाभर तरी कांद्याचे दर आणि पुढील तीन ते चार महिने लसणाचे दर तेजीतच राहणार असल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

अशा परिस्थितीत, ग्राहकांना कांदा–लसूण खरेदी करताना हात जरासा आखडताच घ्यावा लागणार आहे. हिवाळ्यात येणारा वाटाणाही २५० रुपयांवर गेला आहे. हिरव्या भाज्यांचे भावही वधारले आहेत. त्यात रोजच्या जेवणातील कांदा–लसूण महाग झाल्याची कमतरता राहिली होती की काय म्हणून आता तीसुद्धा पूर्ण झाली आहे. त्यामुळे गृहिणींचे अंदाजपत्रक पुन्हा एकदा कोलमडले आहे. कांदा–लसणाची ही खमंग फोडणी सामान्य ग्राहकांना या थंडीच्या महिनाभर फोडते की नवीन वर्षाचा शुभारंभदेखील खिसा कापूनचं करते काय माहीत?

# ‘जनजाति गौरव दिवस’

भगवान बिरसा मुंडा यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ‘जनजाति गौरव दिवस’ समारोहात सहभागी होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी बिहारच्या जमुई येथे पोहोचले. येथे त्यांनी साडेसहा हजार कोटी रुपयांच्या योजनांची घोषणा आणि उद्घाटन केले. या बहुतांश योजना, किंबहुना सर्वच योजना आदिवासी बांधवांना डोळ्यासमोर ठेवून आखण्यात आल्या आहेत. ‘ज्यांना विचारणारे कोणी नव्हते त्यांची दखल घेण्याचे काम आपल्या सरकारने केले.

संस्कृती असो वा सामाजिक न्याय, प्रत्येक बाबतीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे मापदंड वेगळेच आहेत. द्रौपदी मुर्मू यांना भारताच्या राष्ट्रपती करण्याची संधी आपल्याला मिळाली’, असे पंतप्रधानांनी सांगितले. निवडणुकांच्या धामधुमीत विशेष स्मरण ठेवून मोदी सरकारने भगवान बिरसा मुंडा यांची जयंती इतक्या उत्साहात साजरी केली व देशभरातील माध्यमांमध्ये त्याच्या जाहिरातीही झळकल्या. त्यामागे एक खास कारण असल्याचे आता म्हणता येऊ शकते. झारखंड आणि महाराष्ट्र या दोन राज्यांत विधानसभा निवडणुकांची धामधूम सुरू आहे.



दोन्ही राज्यांत आदिवासींचा मुद्दा प्रकर्षाने मांडला जातो आहे. त्या अनुषंगाने संविधानाचीही चर्चा होते आहे. जातनिहाय जनगणनेचा गेल्या दोन वर्षांपासून ऐरणीवर आलेला मुद्दा आहेच. त्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी या जयंती समारोहानिमित्त विरोधी आघाडीला जो संदेश दिला आहे तो त्यांच्यापर्यंत पोहोचलेच, मात्र देशाच्या राजकारणाची ही नवी मांडणीही पुढच्या काळात महत्त्वाची ठरणार आहे. लोकसभा निवडणुकीत जातनिहाय जनगणनेचा मुद्दा काँग्रेसने मांडला. हरियाणा विधानसभेच्या निवडणुकीतही तो लावून धरण्यात आला.

काँग्रेस नेते राहुल गांधी या विषयावर ठाम आहेत. ‘ज्याची जेवढी संख्या त्याची तेवढी भागीदारी’ असे राहुल यांचे गणित आहे. कल्याणकारी राज्याच्या संदर्भात ही आदर्श अथवा रास्त अपेक्षा आहे. त्यासोबत डॉ. आंबेडकरांच्या संविधानाचे दिले गेलेले दाखले आणि त्यातील मांडणीचा आधार घेत केलेल्या मागण्यांमुळे मोदी सरकारची कोंडी झाल्याचे सगळ्यांनी पाहिले. लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टी प्रणित सरकारला त्याचा फटका बसला. महाराष्ट्रासारख्या प्रगतीशील राज्यात आणि उत्तर प्रदेशसारख्या जातीधिष्ठित राजकारण करणार्या राज्यात भाजपची पीछेहाट झाली.

चारशे जागांचे त्यांचे स्वप्न भंगले. हरियाणा निवडणुकीत तुलनेने सरकार सावरले आणि त्यातच कुठेतरी या पक्षाला जातनिहाय जनगणनेच्या आक्रमक मागणीवर तोडगा सापडला. तो समजून घेण्यासाठी आपल्याला देशातील एकूण लोकसंख्येच्या राज्यवार वैशिष्ट्याचा आढावा घ्यावा लागेल. आपल्याकडे प्रत्येक राज्यात तेथील एका विशिष्ट समाजाचे प्राबल्य राहिले आहे. राजकारण, शिक्षणसंस्था आणि अन्य सर्वच क्षेत्रांत जास्त असलेली संख्या आणि सक्षम स्थितीमुळे त्या त्या राज्यांच्या राजकारणावर या समाजांचा प्रभाव राहिला आहे.

या प्रभावाच्याच चक्रात अडकल्यामुळे नंतरच्या काळात काँग्रेसचे राजकीय नुकसान झाल्याचे दिसते. मात्र, पंतप्रधान म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या सरकारचे प्रत्येक बाबतीत मापदंड वेगळेच राहिले. ते कसे, तर याची सुरुवात अगदी पंतप्रधानांच्या गुजरातपासूनही करता येते. त्यांनी गुजरात सोडला त्यावेळी राज्यातील प्रबळ समाजातील नेत्याकडे अल्पकाळासाठी सूत्रे सोपवली. त्यानंतर राज्याचे शकट अन्य जातीच्या नेत्याकडेच राहिले. तेच महाराष्ट्रात आणि अगदी हरियाणातही केले गेले. नायबसिंह सैनी यांच्याकडे त्यांनी निवडणुकीच्या अगोदर आणि नंतरही सूत्रे सोपवली. ती या विशिष्ट रणनीतीतूनच. काँग्रेसने भूतकाळात केलेल्या चुकांपासूनच भाजपने हा धडा घेतला आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशातील सर्वात बलाढ्य पक्ष असूनही आणि कोणाचे प्रबळ आव्हान नसूनही काँग्रेसने आपल्यात समाजातले सगळे प्रवाह सांभाळून घेतले आणि त्यांना योग्य प्रतिनिधित्व दिले. तथापि, असे असूनही काँग्रेसच्या काळात बहुतांश राज्यांत प्रादेशिक स्तरावर प्रबळ समाजांची मक्तेदारी कायम राहिली हे नाकारता येत नाही. त्यातून इतर ७० टक्के समुदाय राजकीय लाभापासून बर्यापैकी वंचित राहिला हेही तेवढेच खरे. हा उर्वरित समाज जागृत झाला आणि त्यांच्या आंदोलनाला नव्वदच्या दशकात चेहराही मिळाला व बळही मिळाले. अनेक राज्यांत सत्तांतरे झाली आणि प्रस्थापित वर्गाच्या बाहेरचा चेहरा बहुतेक राज्यांच्या सत्तेवर आला. सर्वत्र एकाहाती सत्ता हस्तगत करणारी काँग्रेस त्यानंतर मागे पडत गेली.

सत्तेतून पूर्ण बाहेर जरी गेली नाही तरी काँग्रेसला विविध पक्षांचा अर्थात प्रभावशाली वर्गाच्या बाहेरच्या समाजांच्याच नेतृत्वांचा आणि त्यांच्या प्रादेशिक पक्षांचा आधार घ्यावा लागला. हा भूतकाळ काँग्रेसला स्मरत असल्यामुळेच त्यांनी गमावलेला जो अन्य वर्ग आहे तो पुन्हा काँग्रेसशी जोडून घेण्यासाठी पद्धतशीर प्रयत्न सुरू केले. त्यातूनच लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व आणि जातनिहाय गणना आदी मुद्दे समोर आले आहेत. आजच्या स्थितीसंदर्भात बोलायचे झाले तर दलित, ओबीसी, आदिवासी आदी समुदायांचे ज्या राज्यांमध्ये प्राबल्य आहे त्या सर्व राज्यांमध्ये भारतीय जनता पार्टी अथवा त्यांच्या मित्रपक्षांचे सरकार आहे. जोपर्यंत हे समुदाय आपल्याकडे आणता येत नाही.

तोपर्यंत या राज्यांच्या सत्तेत आपल्याला शिरकाव करता येणार नाही याची काँग्रेसला जाणीव आहे आणि त्यांना याची जाणीव झाली असल्याची पंतप्रधान मोदी आणि भाजपला जाणीव असल्यामुळे ही स्पर्धा शिगेला पोहोचली आहे. जनगणना करण्याचे सूतोवाच केंद्राकडून करण्यात आले आहे. जातनिहाय गणनेबाबत मात्र सोयीस्कर मौन बाळगले गेले आहे.

प्रभावी वर्गालाच सगळे सोपवण्यापेक्षा उर्वरित ७० टक्के वर्गाला जर योग्य प्रतिनिधित्व दिले गेले, तर आपले सरकार चालवणे सुकर होते. सर्वसमावेशकतेच्या वैशिष्ट्यामुळेच एकेकाळी निर्विवाद वर्चस्व राखणारी काँग्रेस आज पुन्हा आपल्या त्याच जुन्या वैभवाकडे जाण्याच्या प्रयत्नात आहे, तथापि, त्यासाठी ते जो आधार घेत सरकारची कोंडी करू पाहण्याचा प्रयत्न करत आहेत त्यावरचा उपाय सरकारलाही काँग्रेसच्या भूतकाळातूनच मिळाला आहे.

# हिवाळ्यात फाटत आहेत पाय? मग कसला विचार करताय? वापरा 'हा' उपाय

हिवाळ्यात हवामान कोरडे असते, ज्यामुळे त्वचा लवकर कोरडी होते. टाच फाटणे ही समस्या नेहमीच होणारी सामान्य समस्या आहे, पण ती वेळेवर सोडवली नाही तर ती गंभीर होऊ शकते.

ऋतू जसे बदलत जातात तसे आपले आरोग्य आणि त्यावर होणारे परिणामही बदलत जातात. हिवाळ्यात फाटणारे पाय आणि यावर उपाय काय? याचा शोध बरीच मंडळी घेत असतात. या बदलत्या वातावरणात आपले आरोग्य फार झुंज देत असते. अशा वेळी आपले आरोग्य राखणे फार महत्वाचे होऊन जाते. पाय फाटणे ही अतिशय सामान्य बनत जाणारी परिस्थिती आहे. बरीच माणसे या त्रासाने त्रस्त आहेत.

हिवाळ्यात तयार करा पौष्टिक आणि चवदार गाजर कांजी! पिढ्याबपीढ्या बनवली जात आहे रेसिपी

हिवाळ्यात हा त्रास फार वाढत जातो. वाढत्या या त्रासाला रोखणे फार गरजेचे असते. कारण हे फाटणारे पाय आणि



त्यातून येणारे रक्त फार त्रासदायक असते. आणि हे फार चांगलेही दिसत नाही. तळव्याच्या त्वचेला क्रॅक्स येत असतात. विटामिनच्या कमतरतेमुळे अनेकदा तुमची टाच फाटू शकते. विटामिन सी, विटामिन इ३, आणि विटामिन ई यांची कमतरता त्वचेला कोरडेपणा देते, आणि यामुळेच टाच फाटण्याची समस्या उद्भवते.

त्वचेला मॉश्चराइज करणे फार महत्वाचे आहे. त्यासाठी शरीरात पाण्याचे सेवन उत्तम असावे लागते. पाणी जास्त प्या, जितके पाण्याचे सेवन जास्त तितका शरीराला फायदा होत असतो. पण पाण्याचे कमी सेवन त्वचेच्या सुखेपणाला कारणी ठरतो आणि टाच फाटणे सारखी समस्या उद्भवते. त्यामुळे हिवाळ्याच्या दिवसात चांगल्या क्वालिटीचा मॉश्चराइजर लावणे फायद्याचे ठरते. कोणताही मॉश्चराइजर वापरण्याच्या अगोदर डॉक्टरांचा किंवा त्वचा तज्ञांचा सल्ला नक्की घ्या.

पेरू पिकून नरम झाले आहेत? मग घरी बनवा आंबटगोड पेरु कँडी, लहान मुलं होतील खुश

अशा प्रकारे करा फाटलेल्या टाचेवर उपाय:

एका टबमध्ये कोमट पाणी घ्या आणि त्यात थोडे मीठ घाला. पाय १५-२० मिनिटे भिजवा. यामुळे त्वचा मऊ होईल आणि मृत त्वचा काढायला सोपे जाईल. भिजवून झाल्यावर स्क्रबचा वापर करून टाच स्वच्छ करा.

टाचेला योग्य मॉश्चरायझर लावल्याने त्वचा मऊ राहते. नॅचरल मॉश्चरायझरमध्ये नारळाचे तेल, बदाम तेल किंवा शिया बटर यांचा समावेश करा. झोपण्यापूर्वी लावा आणि त्यावर सॉक्स घालून झोपा, ज्यामुळे मॉश्चर लॉक होईल.

ग्लिसरीन आणि गुलाबपाण्याचे मिश्रण बनवून फाटलेल्या टाचांवर लावा. यामुळे त्वचेचा कोरडेपणा कमी होतो आणि टाच मऊ होतात.

पिकलेल्या केळीचा पेस्ट तयार करून टाचांवर लावा. २० मिनिटांनी कोमट पाण्याने धुवा. केळीत असणाऱ्या नैसर्गिक गुणधर्मांमुळे त्वचेची आर्द्रता टिकून राहते.

मध आणि दुधाचे मिश्रण टाचांवर लावल्याने त्वचेला पोषण मिळते. हे मिश्रण अँटी-बॅक्टेरियल असते, ज्यामुळे त्वचा संक्रमणापासून दूर राहते.

जर घरगुती उपायांनी आराम मिळत नसेल किंवा टाच फाटल्यामुळे इन्फेक्शन झाले असेल तर त्वचारोग तज्ञांचा सल्ला घ्या.

---

## कोणतीही मेहनत न करता घाण-पिवळे टॉयलेट सीट होईल क्षणार्धात साफ, या १० रुपयांच्या वस्तूचा करा वापर

अनेकांना पिवळी टॉयलेट सीट स्वच्छ करण्यासाठी फार मेहनत घ्यावी लागते. कधी कधी महागडे क्लिनर देखील हे साफ करण्यात अपयशी ठरत असतात. अशात तुम्ही घरीच अवघ्या १० रुपयांत एक प्रभावी क्लिनर तयार करू शकता.

आपले घर स्वच्छ असावे असे सर्वांना वाटत असते. बऱ्याचदा घरातील कोपरा कोपरा साफ केला जातो मात्र टॉयलेट साफ करणे राहून जाते. घराचा प्रत्येक कोपरा स्वच्छ करण्यापेक्षा टॉयलेट स्वच्छ ठेवणे महत्त्वाचे आहे. हाईजीन मेंटेन करण्यासाठी टॉयलेट पिवळे दिसू नये, तर ते नेहमी चकाचक राहावे, ही प्रत्येकाची इच्छा असते. जेणेकरून, पाहुणे आले की, घाणेरडे टॉयलेट पाहून लाजिरवाणे वाटू नये. आता अनेकांना घरातील टॉयलेट सीट साफ करणे फार कठीण काम वाटत असते. आम्ही सांगत असलेल्या या ट्रिकने आता तुम्हाला कठीण वाटत असलेले हे काम सोपे होणार आहे.





तासनतास टॉयलेट घासण्याचे कष्ट टाळण्यासाठी लोक बाजारातून महागडे क्लिनर विकत घेतात आणि, कधीकधी हे महागडे क्लिनर देखील प्रभावी असल्याचे सिद्ध होत नाही. मात्र आम्ही तुम्हाला सांगतो की, कमीत कमी खर्चातही तुम्ही टॉयलेट पूर्णपणे चमकदार बनवू शकता. यासाठी तुम्हाला १० रुपयांना मिळणारे फ्रूट सॉल्ट वापरावे लागेल आणि साफसफाईची योग्य प्रक्रिया जाणून घ्यावी लागेल. याच्या मदतीने कोणतीही अधिक मेहनत न घेता तुम्ही काही क्षणातच तुमच्या घरातील घाणेरडा टॉयलेट चकचकीत साफ करू शकता.

लाईफस्टाईल संबंधित बातम्या वाचण्यासाठी इथे क्लिक करा

क्लिनर बनवण्यासाठीचे साहित्य

फ्रूट सॉल्ट (इनो)

मीठ

लिंबू

बेकिंग सोडा (ऑप्शनल)

डिटर्जंट

अशाप्रकारे बनवा घरगुती क्लिनर

यासाठी सर्वात आधी एका भांड्यात अर्धा लिंबाचा रस काढा. आता त्यात अर्धा डिटर्जंट पावडर एका छोट्या चमच्याने घाला. आता अर्धा लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार करावे लागेल. जर टॉयलेट सीट खूप गलिच्छ दिसत असेल तर तुम्ही बेकिंग सोडा देखील घालू शकता. हे सर्व चमच्याने नीट मिसळून झाल्यावर शेवटी एक छोटा पॅकेट एनो पावडर म्हणजेच फ्रूट सॉल्ट घाला आणि मिसळा. आता तुमचा क्लिनर घरच्या घरी बनून तयार आहे.

लाईफस्टाईल संबंधित बातम्या वाचण्यासाठी इथे क्लिक करा

टॉयलेट क्लीन करण्याची पद्धत

होममेड क्लिनरने टॉयलेट स्वच्छ करण्यासाठी, हे तयार द्रावण टॉयलेट सीटमध्ये ओता आणि ब्रशच्या मदतीने पसरवा आणि काही काळ असेच राहू द्या, आता ब्रशने घासून टॉयलेट स्वच्छ करा. तुम्हाला डाग निघेपर्यंत काही वेळ टॉयलेट घासावे लागेल, त्यानंतर यावर पाणी ओतून टॉयलेट सीट स्वच्छ करा. यानंतर तुम्ही पाहाल की यावरील पिवळा डाग दूर झाला असेल आणि तुमचे टॉयलेट नव्यासारखे चमकत असेल.

टीप - ही माहिती केवळ वाचनाकरिता देण्यात आली आहे. कोणताही दावा आम्ही करत नाही. संकेतस्थळांवरून अभ्यास करून मिळालेल्या माहितीनुसार ही माहिती असून वाचकांच्या ज्ञानात अधिक भर घालण्याचा हा प्रयत्न आहे.

## हिवाळ्यात तयार करा पौष्टिक आणि चवदार गाजर कांजी! पिढ्याबपीढ्या बनवली जात आहे रेसिपी

गाजर कांजीचे नियमित सेवन केल्याने तुमचे डोळे निरोगी राहतात. एवढेच नाही तर गाजराची कांजी प्यायल्याने तुमची पचनशक्ती आणि रक्तदाबही सुधारतो, चला जाणून घेऊया गाजराची कांजी कशी बनवायची.

हिवाळा ऋतू सध्या सुरु आहे. या ऋतूत बाजारात अनेक भाज्या विक्रीसाठी येत असतात. या मोसमात गाजर देखील मोठ्या प्रमाणात येत असते. अशात तुम्ही घरी गाजर कांजी तयार करू शकता. कांजी हे एक आंबवलेले पेय आहे. हे उत्तर भारतातील अतिशय लोकप्रिय पेय आहे. हे गाजर आणि बीटरूटपासून बनवले जाते, ज्यामुळे आरोग्यासाठी हे पेय फार फायदेशीर ठरते. हा पारंपरिक पदार्थ आहे. कांजी हे एक तिखट, खारट पेय आहे जे तुमच्या पचन, आतडे आणि प्रतिकारशक्तीसाठी निरोगी ठेवण्यासाठी फायद्याचे मानले जाते. सर्दी, खोकला आणि पोटाचा त्रास दूर ठेवण्यासाठी हे खूप फायदेशीर पेय आहे.

हिवाळ्याच्या थंडीत हे पेय तुमच्या आरोग्यासाठी फार आरोग्यदायी ठरेल. गाजर ही एक हंगामी भाजी आहे ज्यात व्हिटॅमिन-ए, कॅल्शियम, फायबर, अँटिऑक्सिडेंट, बीटा कॅरोटीन, व्हिटॅमिन-सी, व्हिटॅमिन-के, पोटॅशियम आणि लोह यासारख्या गुणधर्मांचा साठा आहे. हिवाळ्यात अनेक लोक गाजरापासून याचे चमचमीत लोणचे, हलवा बनवून त्याचा आस्वाद घेत असतात मात्र आम्ही तुम्हाला सांगतो की, यावेळी तुम्ही एकदा गाजर कांजी बनवून पहा. याचे आरोग्याला फार फायदे



होतात. याचे नियमित सेवन केल्याने आपले डोळे निरोगी राहतात आणि रक्तदाबही नियंत्रणात राहतो. चला तर मग जाणून घेऊयात यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.

रेसिपीच्या बातम्या वाचण्यासाठी इथे क्लिक करा

साहित्य

काळे गाजर - २ ते ३

बीटरूट - १ लहान

मोहरी - १ टेस्पून

मीठ - १ टेस्पून

लाल तिखट - १ टीस्पून

हिंग - १ चिमूटभर

पाणी - अडीच लिटर

रेसिपीच्या बातम्या वाचण्यासाठी इथे क्लिक करा

कृती

गाजर कांजी तयार करण्यासाठी सर्वप्रथम गाजर आणि बीटरूट धुवून घ्या

यांनतर गाजराचे आणि बीटाचे बारीक तुकडे करून घ्या

आता अडीज लिटर पाणी उकळून घ्या

यानंतर गाजर आणि बीटरूट एका काचेच्या बरणीत ठेवा आणि त्यात मोहरी, मीठ, हिंग आणि लाल तिखट घाला आणि चांगले मिसळा

आता उकळलेले आणि थंड केलेले पाणी टाकून बरणी किमान ४ दिवस उन्हात ठेवा

बरणी दररोज थोडीशी हलवा जेणेकरून सर्व साहित्य नीट एकत्र मिसळले जाईल

४ दिवसांनंतर तुमची गाजर कांजी तयार होईल

दुपारच्या जेवणात किंवा न्याहारीसोबत ही कांजी पिण्यासाठी सर्व्ह करा

तुम्ही ही गाजर कांजी दोन महिन्यांपर्यंत साठवून ठेवा

गाजराचे फायदे:

गजरात पोषक घटक असतात जे डोळ्यांसाठी फायदेशीर ठरतात, यात व्हिटॅमिन ए आणि अल्फा-कॅरोटीन आणि

बीटा-कॅरोटीन ही दोन कॅरोटीनॉइड्स मुबलक प्रमाणात असतात

गजरात भरपूर फायबर असते जे रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यास मदत करतात

गाजरामध्ये पोटॅशियम असते जे बीपी नियंत्रणात ठेवण्यास मदत करते

---

## पेरू पिकून नरम झाले आहेत? मग घरी बनवा आंबटगोड पेरू कँडी, लहान मुलं होतील खुश


बाजारातून विकत आणलेला पेरू जास्त पिकल्यानंतर खाण्याची इच्छा होत नाही. अशावेळी तुम्ही पेरूपासून कँडी बनवू शकता. तुम्ही बनवलेली पेरू कँडी लहान मुलांसह मोठ्यांसुद्धा खूप आवडेल. जाणून घेऊया पेरू कँडी बनवण्याची सोपी रेसिपी.

चवीला आंबट गोड असलेले पेरू सगळ्यांचं खूप आवडतात. पेरू खाल्यामुळे शरीराला अनेक फायदे होतात. हिवाळ्यासह इतर सर्वच ऋतूंमध्ये बाजारात पेरू उपलब्ध असतात. पेरूपासून ज्युस, सरबत किंवा इतर गोड पदार्थ बनवले जातात. बाजारातून घरी पेरू विकत आणल्यानंतर ते लगेच पिकतात. पिकलेले पेरू नरम झाल्यानंतर खाण्याची इच्छा होत नाही. अशावेळी पेरू फेकून दिले जातात किंवा मग पोपटाला खाण्यासाठी दिला जातो. पण पिकलेला पेरू फेकून देण्याऐवजी तुम्ही पेरूपासून आंबट गोड पेरु कँडी बनवू शकता. तुम्ही बनवलेली पेरू कँडी लहान मुलांसह मोठ्यांना खुप आवडते. चला तर जाणून घेऊया पेरू कँडी बनवण्याची सोपी रेसिपी. (फोटो सौजन्य-ळीींलज्ञ)

नवनवीन रेसिपीसाठी इथे क्लिक करा

पेरू खाल्यामुळे आरोग्याला अनेक फायदे होतात. पेरूमध्ये असलेल्या गुणधर्मांमुळे त्वचा आणि केससंबंधित समस्या कमी होण्यास मदत होते. तसेच लहान मुलांना सतत बाहेरून गोळ्या किंवा चॉकलेट आणून देण्यापेक्षा घरी बनवलेली होममेड कँडी खाण्यास द्यावी. पेरूपासून बनवलेले पदार्थ अधिककाळ चांगले





टिकून राहतात. शिवाय तुम्ही पदार्थ बाहेर फिरायला गेल्यानंतर प्रवासामध्ये सुद्धा खाऊ शकता. चला तर जाणून घेऊया पेरू कँडी बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:

पेरू

साखर

बटर

आयसिंग शुगर किंवा पिठीसाखर

नवनवीन रेसिपीसाठी इथे क्लिक करा

कृती:

पेरू कँडी बनवण्यासाठी सर्वप्रथम पेरू स्वच्छ करून घ्या. त्यानंतरण त्याचे बारीक बारीक तुकडे करा.

कापून घेतलेले पेरूचे तुकडे चाळणीमध्ये ठेवून हलकेसे वाफवा. जास्त वाफ पेरूला काढू नये.

वाफवलेले पेरू थंड झाल्यानंतर मिक्सरच्या भांड्यात टाकून त्यांची बारीक पेस्ट तयार करा.

तयार केलेली पेस्ट गाळणीमध्ये ओतून व्यवस्थित गाळून घ्या.


पॅनमध्ये तयार केलेली पेरूची पेस्ट आणि साखर मिक्स करून शिजण्यासाठी ठेवा. पेरूची पेस्ट शिजत आल्यानंतर त्यात बटर टाकून पुन्हा एकदा व्यवस्थित मिक्स करा.


पेरूची पेस्ट जाडसर घट्ट झाल्यानंतर गॅस बंद करून तयार मिश्रण काचेच्या भांड्यात काढून घ्या आणि पसरवा.

मिश्रण थंड झाल्यानंतर सुरीच्या साहाय्याने तुम्हाला हवे त्या आकाराचे तुकडे करून आयसिंग शुगर किंवा पिठीसाखरमध्ये पेरू कँडी घोळवून घ्या.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली आंबटगोड पेरु कँडी.

## वनविभागात चाललंय तरी काय? सारखणी घाटातून मृत बिबट्याच्या शवाची तस्करी तर माहूर न्यायालयाजवळ कोल्ह्याचा संशयास्पद मृत्यू..?





किनवट/शेख शौकत :–माहूर येथील न्यायालयाच्या काही अंतरावर एक कोल्हा मृतावस्थेत आढळून आला असल्याने वन्यप्रेमीनी नाराजी व्यक्त करीत माहूरचे, 'वन अधिकारी' झोपेचे सोंग घेते की काय ? असा प्रश्न नागरिक व वन्यप्रेमीनी केला आहे. तर अन्नपाणी मिळाले नसल्याने त्या कोल्ह्याचा मृत्यू झाला असल्याचा अंदाज वर्तविला असून वनविभाग अजुन किती मुक्या प्राण्यांचे जीव घेणार ? असा संतप्त सवाल वन्यप्रेमीनी केला आहे. वनपरिक्षेत्र कार्यालय माहूर वनसंपदेचा होणारा ऱ्हास बघता वन्यजीवांचा सुरक्षित अधिवास धोक्यात आला आहे. आता त्यांचे हक्काचे घरच सुरक्षित राहिलेले नाही. तृणभक्षक प्राण्यांची व जंगलातील पाणवठ्यांची संख्या घटल्यानेही भक्ष्याच्या शोधात हे वन्यजीव आपला मोर्चा गाव आणि शहरांकडे वळवित असल्याचे अनेक उदाहरण आहे.अशातच वनपरिक्षेत्र कार्यालय मांडवी अंतर्गत सारखणी घाटातील जंगलातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील वन तपासणी नाक्याच्या काही अंतरावरच अज्ञात वाहनाच्या धडकेत दि. २७ ऑक्टो रोजी रात्री सुमारे ८:३० ते ९ च्या दरम्यान बिबट्या जातीच्या वाघाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. गावाकडे येणाऱ्या या वन्यजीवांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. माहूर वन क्षेत्रातील अनेक भागात बिबट्यांचा वावर असल्याचे पुरावे मिळाले वन्यप्रेमी यांनी अनेक वेळी माहूरचे वन्य अधिकारीला फोनवर संपर्क केले पण अधिकारी फोन उचलून बोलत नाही अशी वन्यप्रेमी चर्चा करत आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत ओसाड होणारी जंगले, त्यामुळे तृणभक्षक प्राण्यांची वळले आहेत. त्यामुळे आता मानव व वन्यजीव हा संघर्ष नित्याचा झाला आहे. अशातच माहूर न्यायालयाच्या काही अंतरावर एका कोल्हाचा तोंडातून फेस जावून मूत्यु झाल्याची घटना घटती संख्या यामुळे हे भुकेने व तहानेने व्याकूळ झालेले बिबटे मनुष्यवस्तीकडे घडली असून कोल्ह्याच्या तोंडातून फेस आला असल्यामुळे प्रत्यक्षदर्शनी बघणार्या नागरिकांनी अनेक तर्क वितर्क लावत कोल्ह्याने जंगलात किंवा शेतात विषारी अन्न खाले असेलतर तो तिथेच मुर्तुमुखी पडला असता. पण तो गावा शेजारी येऊन मृत्युमुखी पडला असल्यामुळे कुठे तरी संशयाची पाल चूकचूक करीत असल्याची चर्चा असून माहूर वनविभाग प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर शंका घेतली जात आहे. या संशयीत मृत आहे कोल्हाच्या मृत्यू बाबत वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव यांच्याशी फोन वरून संपर्क साधला असता त्यांनी संपर्क जोडून घेतला नसल्याने अशी चर्चा वन्यप्रेमी करत आहे.या प्रकराणाची अधिकची माहिती मिळू शकली नाही.

# वंचितचे : सुनील भोले यांना आमदार करण्यासाठी महागायक : आनंद शिंदे प्रचाराच्या मैदानात...

### १५१ बेलापूर विधानसभा निवडणुकीत भाजपा – काँग्रेस कोमात







नवी मुंबई / के.एच. हनवते :– वंचित बहुजन आघाडी १५१ बेलापूर विधानसभेचे अधिकृत, लोकप्रिय उमेदवार : सुनील भोले यांना आमदार करण्यासाठी महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध महागायक : आनंद शिंदे प्राचाराच्या मैदानात उतरले आसुन भाजपा – काँग्रेस विरोधकांच्या उरात धडकी भरली आहे..! १५१ बेलापूर विधानसभेत धन दांडगे उमेदवार रिंगणात आहेत, येथे धनशक्ती विरूद्ध जनशक्तीची तिरंगी लढाई होत आसल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. या विधानसभा निवडणूक प्रचारात भाजप – कांगेस पिछाडी ..! सबसे आगे वंचित बहुजन आघाडी..!! आसेच सर्वत्र चित्र दिसून येत आहे, सर्वच स्तरातून वंचित चे अधिकृत उमेदवार : सुनील प्रभू भोले यांना जनतेचा जाहीर पाठींबा मिळतो आहे, विविध ठिकाणी सुनील भोले यांचे जंगी स्वागत केले जात आहे. त्यामुळे वंचित बहुजन आघाडी कार्यकर्त्यात एक उत्साह व जोशपूर्ण वातावरण निर्माण झाल्याचे चित्र सध्यातरी दिसून येत आहे, मागील लोकसभा निवडणुकीत वंचित चा उमेदवार रिंगणात नसल्यामुळे कार्यकर्त्यात एक प्रकारचे नैराश्य निर्माण झाले होते. ति पोकळी अँड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी भरून काढली आणि आपलाच कार्यकर्ता गेल्या विस वर्षांपासून आंबेडकर घराण्याशी एकनिष्ठ राहीले आहेत आसे बेलापूर तालुकाध्यक्ष : सुनील भोले यांना वंचित ची अधिकृत उमेदवारी दिल्याने कार्यकर्त्यात एक उत्साह आणि जोश निर्माण झाला आहे, कार्यकर्ते स्वयंस्फूर्तीने आपल्या घरची दाल रोटी खाऊन तन मन धनाने सुनील भोले यांना प्रचारात सहकार्य करीत आहेत, नक्कीच येत्या २० नोव्हेंबरला वंचित बहुजन समाज, बौद्ध–आंबेडकरी समाज (एससी, एसटी, ओबीसी, आणि मुस्लिम) समाज भरघोस मतदान करून वंचित बहुजन आघाडीचा विजय रथ पुढे नेहतील आसेच सध्यातरी बेलापूर विधानसभेत चित्र स्पष्ट झाले आहे.

# पांडुरंगाच्या महाराष्ट्रात प्रचाराच्या वारीसाठी आलो याचा आनंद – सुपरस्टार पवनकल्याणजी





लातूर/प्रतिनिधी:छत्रपती शिवाजी राजांची ही भूमी आहे. ही संतांची भूमी आहे,ही वीरांची भूमी आहे.या सर्वांना नमन करण्यास मी आलो आहे. पांडुरंगाच्या वारीचा हा महाराष्ट्र आहे.या महाराष्ट्रात प्रचाराच्या वाढीसाठी येता आलं याचा मला आनंद होत आहे,अशा अस्खलित मराठी वाक्यातून बोलत दक्षिणात्य सुपरस्टार, जनसेना पक्षाचे अध्यक्ष आणि आंध्रप्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याणजी यांनी लातूरकरांची मने जिंकून घेतली.

लातूर शहर मतदारसंघातील भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्यासाठी पवनकल्याणजी यांनी लातुरमध्ये रोड शो केला. त्यानंतर महात्मा गांधी चौकात आयोजित सभेत पवनकल्याणजी बोलत होते.माजी खासदार अमर साबळे,डॉ.सुनिल गायकवाड, उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर,शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे,महिला मोर्चाच्या अध्यक्षा रागिनीताई यादव, गुरुनाथ मगे,शैलेश गोजमगुंडे, दिग्विजय काथवटे,गणेश गोमसाळे,प्रविण कस्तुरे आदींसह मान्यवरांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती.

या भूमीला नमन करण्यासाठी मी आलो आहे. लाडक्या बहिणी आणि भावांनाही प्रेमपूर्वक नमस्कार, अशा शब्दात पवनकल्याण यांनी आपले भाषण सुरू केले.मी मराठी भाषेचा सन्मान करतो. त्यामुळे मराठी बोलण्याचा प्रयत्न करत आहे.माझे उच्चार चुकले तर मला क्षमा करा,असेही पवन कल्याणजी म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी,गृहमंत्री अमित शहा,रस्ते विकासमंत्री नितीन गडकरी,राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांचा मी आभारी आहे.त्यांनीच मला या भूमीत येण्याची संधी दिली.परंतु फक्त मते मागण्यासाठी मी आलो नाही. वीरांच्या भूमीला नमन करण्यासाठी येथे आलो आहे. छत्रपती शिवरायांच्या या भूमीने लढण्यास शिकवले.मला स्वराज्याचा अर्थ शिकवला. जिजाऊ मातेच्या संस्कारांची ही भूमी आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची कर्मभूमी आहे. त्यामुळे या भूमीला मी नमन करतो,असेही ते म्हणाले.

भारतीय जनता पक्ष व स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांची शिवसेना आणि माझा जनसेना हा पक्ष संपूर्णपणे जनतेसाठी समर्पित आहेत. बाळासाहेब ठाकरे यांना भेटणे मला शक्य झाले नाही.पण त्यांच्याकडून मला लढण्याची प्रेरणा मिळाली.आपल्या राज्याच्या हितासोबतच राष्ट्राचेही हित साधले पाहिजे हा सिद्धांत मी बाळासाहेब ठाकरे यांच्याकडून शिकलो,असा आदरपूर्वक उल्लेख पवन कल्याणजी यांनी केला.

केंद्रातील सरकारने मागील १० वर्षात राम मंदिर व ३७० कलम हटवण्यासारखी मोठी कामे केली.भारताचा तिरंगा आज जगात ताठ मानेने उभा आहे.राष्ट्रीय महामार्गाचे जाळे देशभर झाले. सरकारने २५ कोटी लोकांना दारिद्र्यरेषेतून बाहेर काढले.शेतकऱ्यांना विविध योजना लागू केल्या. त्यामुळे मी राष्ट्रीय लोकशाही आघाडीसोबत जोडला गेलेला आहे.केंद्रात राष्ट्रीय लोकशाही आघाडी व राज्यातील महायुती सरकार याच विचाराने काम करत आहे. छत्रपती शिवाजी राजांनी आदर्श स्थापित केले,साहस केले त्यामुळे ते प्रेरणास्त्रोत आहेत. त्यांची विचारधारा विशेष आहे. महाराष्ट्रधर्म म्हणून ती ओळखली जाते.राज्यातील सरकार शिवरायांच्या विचारावरच चालत असल्याचे पवनकल्याणजी यांनी सांगितले.लातूर तिरूपती विमानसेवा व रेल्वेसाठी प्रयत्न करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

माजी खासदार अमर साबळे म्हणाले की,पवन कल्याण हे हिंदुत्वाचा चेहरा आहेत म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांना आंधी असे म्हणतात. पवनकल्याण आंधी है,लातूर मे काँग्रेस का सुपडा साफ करना बाकी है, असेही साबळे म्हणाले.

यावेळी मनोगत व्यक्त करताना उमेदवार डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाल्या की, लातूरची तरुणाई आणि सामान्य जनता भाजपाच्या मागे उभी आहे. लातूरकरांच्या प्रेमामुळेच नियोजित नसतानाही पवन कल्याणजी यांनी रोड शो केला. हे प्रेम असेच कायम राहू द्या,असे आवाहन करत लातूरहून तिरुपतीसाठी रेल्वे सुरू करून बहिणीला भेट द्यावी,अशी मागणी डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी केली.

उत्साही तरुणांचा जल्लोष... दक्षिणात्य सुपरस्टार पवन कल्याण यांचे प्रसिद्ध संवाद ऐकण्यासाठी तरूण इच्छुक होते.त्यांच्या गीतांवर ठेका धरणारी तरुणाई असे काही संवाद ऐकण्यासाठी, पवन कल्याणजी यांनी असे संवाद म्हणावेत अशी मागणी वारंवार करत होती.या तरुणांना पवन कल्याणजी यांनीही नाराज केले नाही.भाषणात काही वेळा तेलगू वाक्य उच्चारत त्यांनी तरुणांचा उत्साह द्विगुणित केला.

जय महाराष्ट्रने सांगता...

पवन कल्याणजी यांनी संपूर्ण भाषण मराठीत केल्यानंतर 'जय महाराष्ट्र'ने भाषणाची सांगता केली.तरुणांनी आग्रह केल्यामुळे बाय–बाय अमित लिहिलेले पोस्टर त्यांनी पुन्हा एकदा हातात घेऊन उंचावले.अर्चनाताईंच्या विजयासाठी बाय–बाय अमित भाई,अमित बाय–बाय असेही ते म्हणाले.

## उदगीर, निलंगा, औसा मतदारसंघातील उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची आज तिसरी तपासणी

लातूर, दि. १६ : विधानसभा निवडणूक–२०२४ अंतर्गत उदगीर, निलंगा आणि औसा विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या खर्चाची तिसरी तपासणी १७ नोव्हेंबर २०२४ रोजी होणार आहे. निवडणूक खर्च निरीक्षक डॉ. रामसिंह गुर्जर यांच्या उपस्थित ही तपासणी होणार आहे.

निवडणूक काळात तीन वेळा उमेदवारांच्या निवडणूक विषयक खर्चाच्या नोंदवहीची तपासणी निवडणूक खर्च निरीक्षक यांच्याकडून केली जाते. आतापर्यंत दोन तपासण्या पूर्ण झाल्या असून तिसरी तपासणी १७ नोव्हेंबर रोजी संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात होणार आहे.

यावेळी उमेदवारांनी स्वत: किंवा त्यांचे प्राधिकृत निवडणूक प्रतिनिधी यांनी खर्चाची नोंदवही, प्रमाणके, निवडणुकीसाठीच्या खर्चाचे बँक पासबुकसह व इतर आवश्यक सर्व अभिलेख्यासह संबंधित विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहावे.

तसेच खर्चाच्या नोंदवह्यांच्या तपासणी दरम्यान जनतेचे प्रतिनिधी उपस्थित राहू शकतात आणि प्रत्येक पृष्ठासह १ रूपया इतकी रक्कम प्रदान केल्यावर कोणतीही व्यती कोणत्याही उमेदवाराच्या खर्चाच्या नोंदवहीची प्रत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून घेऊ शकतात.

# सर्वधर्म समभाव आणि विकासाचे राजकारण करणाऱ्या आ.अमित देशमुख यांच्या पाठीशी मतरुपी ताकद उभी करावी–माजी खा.सुधाकर शृंगारे



लातुर / प्रतिनिधी :–लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील भारतीय राष्टीय काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री आ.अमित विलासराव देशमुख यांच्या प्रचारार्थ सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने माजी खा.सुधाकर शृंगारे यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.१५ नोव्हेंबर रोजी लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील साई या ठिकाणी उपसरपंच अमोल पवार यांच्या पुढाकाराने गावातील समाज मंदिरात व खंडापुर येथे सरपंच सूरेश मस्के यांच्या निवासस्थानी संवाद बैठका पार पडल्या.

या बैठकीत बोलताना माजी खा.सुधाकर शृंगारे म्हणाले की,काँग्रेस हा पक्ष सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन केवळ आणि केवळ विकासाचे राजकारण करणारा पक्ष असून भाजपणे निव्वळ जाती पातीची बीजे रोवली,भारतीय संविधानाचा वेळोवेळी अनादरच केला,आम्ही दिन दलित,आदिवासी,सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन चालतो अशी भाषणेच दिली कृती मात्र संपूर्णपणे वेगळी यामुळेच आपण भाजपा सोडली काँग्रेस मध्ये पक्ष प्रवेश केला असल्याचे सांगत उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुका असलेले लातुर जिल्हा झाल्यानंतर लोकनेते विलासराव देशमुख यांच्या काळपासून आजतागायत लातूरचा जो काही विकास झाला आहे तो काँग्रेसनेच केला असून आ.अमित देशमुख हे नव्या पिढीचे काँग्रेसचे नेतृत्व करीत आहेत ज्यासाठी सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे मार्गदर्शन त्यांना मिळत आहे,त्यांच्याकडे आधुनिक विकासाचा दृष्टिकोन आहे यामुळे आपण आ.अमित देशमुख यांना साथ द्यावी. माजी मंत्री आ.अमित देशमुख यांच्या पाठीशी आपण सर्वांनी मताच्या रुपात मोठी ताकद उभी करावी लागेल त्यांना अधिकचे बळ द्यावे लागेल यासाठी आपण तर मतदानाचा हक्क नक्की बजावा यासोबतच आपल्या नातेवाईक व मित्र मंडळींना देखील सांगून येत्या २० तारखेला हाताच्या चिन्हा समोरील बटन दाबून मविआ काँग्रेस पक्षाचे उमेदवार आ.अमित देशमुख यांना प्रचंड मताने विजयी करा असे आवाहन माजी खासदार सुधाकर शृंगारे यांनी बैठकीतून केले. दरम्यान साई आणि खंडापूर येथील बैठकीस उपस्थित ग्रामस्थ मतदार बंधू भगिनीनी या विधानसभा निवडणुकीत आपले सक्षम नेतृत्व आ.अमित विलासराव देशमुख यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून प्रचंड आशा मतांनी विजयी करण्याचा निर्धार यावेळी केला. साई येथील संवाद बैठकीला गावचे निरीक्षक अनिल पाटील,संचालक– ज्ञानेश्वर पवार, ज्येष्ठ नागरिक– श्रीहरी पवार, विठ्ठल पवार, संदिपान पवार,बापू क्षीरसागर,काका पवार,हनुमंत शिरसागर तर खंडापुर गावचे निरीक्षक दंडीमे साहेब,संचालक–अमर कैले,महेश वळसे,गणेश कांबळे मागासवर्गीय विभागाचे अध्यक्ष प्रा. प्रवीण कांबळे यांच्यासह आर्वी व खंडापुर गावातील काँग्रेस पक्षाचे आजी–माजी संचालक व पदाधिकारी,कार्यकर्ते,ग्रामस्थ महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE